| CNR No.: MHND160004822026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८९/२०२६**<br>वसंतराव रामकिशन देशमुख व इतर<br>विरुध्द<br>मॅनेजर महाराष्ट्र ग्रामीण बॅक शाखा तळणी |
|---|---|

## निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश

{दिनांक ०९ जूलै २०२६}

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र.१ ते ५ यांनी भारतीय वारसा कायदा चे कलम ३७२ प्रमाणे **मयत रामकिशन बाबाराव देशमुख** यांचे वारसाहक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेकरिता दाखल केला आहे.

**०२.** सर्व बाबींचे अवलोकन करता निम्नलिखीत मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित झाले असून त्यावर माझे कारणांसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | मयत **रामकिशन बाबाराव देशमुख** यांचे अर्जदार हे वारस असल्याचे व ते वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्यास हक्कदार असल्याचे अर्जदाराने शाबित केले आहे काय ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

**०३.** अर्जदार क्र.१ याने आपल्या अर्जातील कथनांच्या पृष्टयर्थ स्वतःचे शपथपत्र **निशाणी क्र.१२** वर दाखल केले आहे. निबंधक ग्रामपंचायत कार्यालय इरापूर, **ता. हदगाव, जि. नांदेड** यांनी दिलेले **मयत रामकिशन बाबाराव देशमुख** याचे मृत्यु प्रमाणपत्र **निशाणी क्र.१८** आणि **दैनिक दलितवाणी** या वृत्तपत्रातील **दिनांक**

**१६/०४/२०२६** रोजीच्या आवृत्तीमधील जाहीर प्रगटन **निशाणी क्र.१३** वर कागदोपत्री पुरावा अर्जदाराने सादर केला आहे.

**०४.** गैरअर्जदार यांस नोटीस पाठवूनही ते हजर झाले नाहीत, म्हणुन निशाणी क्र.०१ खाली **दि.१७/०६/२०२६** रोजी त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला. अर्जदारांनी **मयत रामकिशन बाबाराव देशमुख** यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत **निशाणी क्र.१८** वर दाखल केली आहे. **मयत रामकिशन बाबाराव देशमुख** यांच्या नावे असलेल्या खाते विवरणपत्राची प्रत **निशाणी क्र.२४** वर दाखल केली आहे. अर्जदारांनी त्यांच्या आधारकार्डच्या छायांकित प्रती **निशाणी क्र. १९ ते २२** वर दाखल केली आहेत.

**<u>मुद्दा क्र.०१ करीताः</u>**

**०५.** अर्जदार क्र. ०१ यांनी त्याच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये अर्जातील सर्व मजकुर शपथेवर सांगीतलेला आहे. त्याने सांगीतले आहे की, **मयत रामकिशन बाबाराव देशमुख** यांचे **दिनांक २२/०५/२०२४** रोजी इरापूर, ता. हदगाव, जि. नांदेड येथे निधन झाले असून, त्यांना अर्जदार हे नात्याने वारस असून इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. **मयत रामकिशन बाबाराव देशमुख** यांच्या नावे गैरअर्जदार यांच्या **महाराष्ट्र ग्रामीण बॅंक, शाखा तळणी, ता.हदगाव जि. नांदेड** येथील **खाते क्र.८०००९८५३५०१** यामध्ये **रुपये ७२,२६०=८६ पैसे** एवढी रक्कम जमा आहे, असे प्रथमदर्शनी दिसुन येते. अर्जदार यांना वारस या नात्याने सदरची रक्कम मिळणेकरीता वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या मृत्यु प्रमाणपत्रावरुन असे दिसून येते की, **मयत रामकिशन बाबाराव देशमुख** यांचे **दिनांक २२/०५/२०२४** रोजी इरापूर, ता. हदगाव, जि. नांदेड येथे निधन झाले आहे.

०६. **दिनांक १६/०४/२०२६** रोजीच्या **दैनिक दलितवाणी** या वर्तमानपत्रामध्ये जाहिर प्रगटन **(निशाणी क्र. १३)** प्रकाशित करुन देखील कोणीही सदर प्रकरणात विरोध व हरकत घेण्याकरीता न्यायालयात हजर झालेले नाही, त्यामुळे अर्जदारांमार्फत सादर केलेला पुरावा हा अबाधित व विना आव्हानित राहिलेला आहे. तसेच मयत यांची **आई मंजुळाबाई बाबाराव देशमुख** हिच्या मृत्युची सिध्दता **नि.क्रं १२** वर दाखल शपथपत्रावरुन होत आहे. तसेच **मयत यांची पत्नी कौशल्याबाई रामकिशन देशमुख** ही मयत झाल्याचे नि.क्रं २६ वरील मृत्यूप्रमाणपत्रावरुन सिध्द होत आहे. सदर पुराव्यावरुन असे दिसुन येते की, **मयत रामकिशन बाबाराव देशमुख** यांचे अर्जदार क्र.१ व २ हे मुले असून अर्जदार क्रं ३ ते ५ मुली हया मयताचे कायदेशीर वारस आहेत. जोपर्यंत अर्जदार क्र. १ ते ५ हे मयताचे वारस नाहीत ही बाब पुराव्यानिशी सिध्द होत नाही तोपर्यंत अर्जदार क्र. १ ते ५ हे मागणीप्रमाणे वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ५ हे **मयत रामकिशन बाबाराव देशमुख** यांच्या **महाराष्ट्र ग्रामीण बॅक शाखा तळणी ता. हदगाव, जि. नांदेड** येथील खात्यातील रक्कमेबाबत वारसाहक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेस हक्कदार आहेत. सबब मुद्दा क्र.०१ चा निष्कर्ष मी "होकारार्थी" असे नोंदवित आहे. परिणामतः मुद्दा क्र.०२ च्या उत्तरात मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.**१) वसंतराव रामकिशन देखमुख २) बालासाहेब रामकिशन देशमुख ३) अरुणाबाई ज्ञानेश्वर पतंगे ४) विमल सुभाषराव सोळंके ५) अलका विष्णु शिंदे** यांना **मयत रामकिशन बाबाराव देशमुख** यांच्या नावे गैरअर्जदार यांच्या **महाराष्ट्र ग्रामीण बॅक शाखा तळणी ता हदगाव, जि.**

**नांदेड** येथील **खाते क्र. ८०००९८५३५०१** यामध्ये **रुपये ७२,२६०=८६ पैसे** किंवा शपथपत्रामध्ये नमुद असलेली रक्कम ही त्यावरील व्याजासह मिळणेकरीता वारस असले बाबत वारसाहक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) देण्यात यावे.

३. तसेच सदर रक्कमेबाबत कोणकडुनही तक्रार आल्यास अथवा न्यायालयाने आदेशीत केल्यास सदर प्रमाणपत्रानुसार मिळालेली सर्व रक्कम अर्जदारांनी विनातक्रार न्यायालयात भरतील असेही लेखी अभिवचन (Undertaking) द्यावे.

४. अर्जदारांनी नियमानुसार न्यायालयीन मुद्रांक शुल्क जमा करावा.

**(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

AMARJEET BHARATRAO JADHAV
Digitally signed by AMARJEET BHARATRAO JADHAV
Date: 2026.07.09 17:29:46 +0530

**(अमरजीत भारतराव जाधव)**
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, हदगाव
ता. हदगाव, जि. नांदेड.

दिनांकः ०९.०७.२०२६
ठिकाणः हदगाव.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, संगणक प्रणालीमध्ये क्रमावली नक्कल करुन घातलेल्या न्यायनिर्णयामध्ये शब्दनाब्दहा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नावः | – | अनिता एस गोदाम |
| न्यायालयाचे नावः | – | दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, हदगाव, ता. हदगाव, जि. नांदेड. |
| आदेशाचा दिनांकः | – | ०९/०७/२०२६ |
| आदेशावर पिठासन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याचा दिनांकः | – | ०९/०७/२०२६ |
| आदेश संगणक प्रणालीमध्ये अपलोड केल्याचा दिनांकः | – | ०९/०७/२०२६ |